# गोंडवाना विद्यापीठाची भविष्यातील दिशा व आराखडा रूपरेषा संदर्भात शैक्षणिक समुदायास आवाहन

गोंडवाना विद्यापीठाची गडचिरोली येथे महाराष्ट्राच्या पूर्वेकडील भागास व आदिवासी बहूल भागात विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधीचा लाभ मिळावा म्हणून महाराष्ट्र शासनाने दिनांक २७ सप्टेंबर, २०११ च्या अधिसुचनेनूसार स्थापना करण्यात आली. विद्यापीठाचे प्रत्यक्ष कामकाम दिनांक २ आक्टोंबर, २०११ पासून सुरू झाले. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात गडचिरोली आणि चंद्रपूर या दोन जिल्हयांचा समावेश आहे. विद्यापीठ ही अभिमत संस्था असून यामध्ये कला, विज्ञान व वाणिज्य, तांत्रिक, व्यवसायीक अशा विविध विद्याशाखेतून पदवी आणि स्थानोत्तर तसेच प्रमाणपत्र व पदवीका शिक्षण दिल्या जाते. विद्यापीठाशी २३७ महाविद्यालये संलग्नीत असून ६४ विविध शैक्षणिक अभ्यासक्रमांचा समावेश आहे व १ लाखाच्या वर विद्यार्थी प्रतिवर्षी लाभ घेत आहेत.

विद्यापीठाचे रूपांतर एका राष्ट्रीय, जागतीक स्तरावर शैक्षणिक, संशोधन, विस्तार व व्यावसायीक क्षेष्ठत्व केंद्रात भविष्यकाळात निर्माण करावयाचे आहे, त्यादृष्टीने विद्यापीठाचा भविष्य कालीन परिसर विकासाचा उत्तम असा आराखडा (रूपरेषा) तयार करावयाचा आहे. यामध्ये शिक्षण व संशोधनाच्या दृष्टीने सुविधा, भौतिक सुविधा तसेच जिल्हयातील उपलब्ध साधन संपत्तीवर आधारीत नविन व्यावसायीक व तांत्रिक अभ्यासक्रम व इतर अनुषंगीक बाबी याचा समावेश असेल.

शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्याच्या प्रस्तावा संदर्भात शैक्षणिक क्षेत्रामध्ये भरिव कामगिरी केलेले आणि अनेक विद्यापीठांना या संदर्भामध्ये मौलीक मार्गदर्शन केलेले ऑबझरर्व्हर रिसर्च फाउंडेशन, मुंबई (Observer Research Foundation, Mumbai) या संस्थेचे चेअरमन श्री. सुधिंद्र कुलकर्णी आपल्या चमूसह गोंडवाना विद्यापीठात विविध क्षेत्रात कार्य करणा—या तंज्ञाशी चर्चा करण्यासाठी व मते जाणुन घेण्यासाठी दिनांक १८/०१/२०१७ रोजी दुपारी १२.३० वाजता उपस्थित राहणार आहेत.

या अनुषंगाने गडचिरोली जिल्हयातील शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणा—या नामवंत व्यक्ती, मान्यवर, व्यवस्थापन परिषद, विद्वत परिषद सदस्य, प्राधिकरणांचे सदस्य, शैक्षणिक संस्थाचे संस्थाचालक, महाविद्यालयाचे प्राचार्य, अध्यापक, पत्रकार यांनी संवाद साधण्यासाठी व मौलीक सूचना विद्यापीठाच्या विकासाच्या आराखडयाची रूपरेषा तयार करण्याच्या दृष्टीने स्वयंस्पूर्तीने उपस्थित राहण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाकडुन आवाहन करण्यात येत आहे.

स्थळ :— विद्यापीठ सभागृह, दिनांक १८.०१.२०१७ वेळ दुपारी १२.३० वाजता

---

(सदर कार्यशाळेस उपस्थित राहण्याकरीता दैनिक भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.)

डॉ. प्रभा. एम. रोकडे
विशेष कार्य अधिकारी
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलीपी :—

सिस्टीम ऍनॉलिस्ट, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना आदेशीत करण्यात येते की त्यांनी विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रकाशित करण्यात यावी,

डॉ. एस. एस. शेळके
विशेष कार्य अधिकारी
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली